# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूजची वेबसाईट सुरू..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

▶ वर्ष-२ ■ अंक-२४ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १६ जानेवारी २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669





# दिवा न्यूज वर्तमानपत्र आयोजित पहिल्या बहुचर्चित चित्रकला स्पर्धेचा निकाल जाहीर!



## पहिली ते चौथी गटात पलक सिंग प्रथम

## तर पाचवी ते नववी गटात जान्हवी सांगळे प्रथम

## १२ फेब्रुवारीला बक्षीस वितरण समारंभ

विजेत्या विद्यार्थ्यांचं हार्दिक अभिनंदन व सहभागी सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धेतील सहभागा बाबत धन्यवाद!

**बक्षीस बक्षीस वितरण संदर्भात माहितीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधा**
**+९१ ९०२९७ ५७०९१**

## निवडक उत्कृष्ट चित्रांना दिवा न्यूज वर्तमानपत्राच्या विशेष अंकातून मिळणार प्रसिद्धी

**दिवा (प्रतिनिधी):**–दिवा न्यूज वर्तमानपत्राने आयोजित केलेल्या दिवा शहर मर्यादित चित्रकला स्पर्धेला दिवा शहरातील विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला. या चित्रकला स्पर्धेत दिवा शहरातील विविध शाळांमधील सुमारे १००० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेचा निकाल जाहीर करताना आम्हाला आनंद होत असून पहिली ते चौथी व पाचवी ते नववी या दोन गटात आयोजित केलेल्या या स्पर्धेतील विजेत्यांचे व उत्तेजनार्थ बक्षीस मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे आम्ही अभिनंदन करत आहोत!

स्पर्धेतील विजयी विद्यार्थी व उत्तेजनार्थ बक्षीस मिळालेले विद्यार्थी यांचा १२ फेब्रुवारी रोजी दिवा न्यूज वर्तमानपत्राच्या कार्यालयात विद्यार्थ्यांना बोलावून त्यांना बक्षीस दिली जातील. चित्रकला स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना दिवा न्यूज टीम मार्फत त्यांच्या शाळेत जाऊन दिवा न्यूज वर्तमानपत्राचे सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

या चित्रकला स्पर्धेत जवळपास १००० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.सर्वच विद्यार्थ्यांनी चांगली चित्र काढण्याचा प्रयत्न केला. यातील निवडक उत्तम चित्रांना दिवा न्यूजच्या विशेष अंकात प्रसिद्ध देण्यात येणार असून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याचे काम दिवा न्यूज वर्तमानपत्र करणार आहे!

– संपादक, दिवा न्यूज

## पहिली ते चौथी गट-अ

**पहिला क्रमांक**
पलक सिंग
इयत्ता चौथी
ग्लोबल इंग्लिश स्कूल

**दूसरा क्रमांक (विभागून)**
- स्मित सोनवणे
  इयत्ता चौथी
  ग्लोबल इंग्लिश स्कूल
- नितेश पोयेकर
  इयत्ता पहिली
  सेंट मेरी स्कूल

**तिसरा क्रमांक**
अंशू पाल
इयत्ता चौथी

**उत्तेजनार्थ**

१. रितिका कौर – इयत्ता पहिली, सेंट मेरी स्कूल
२. अभिजीत महाराणा – इयत्ता पहिली
३. विघ्नेश विनोद आहेर
४. मनस्वी मंगेश शिगवण – इयत्ता चौथी
५. गाथा आतिश हूळे – इयत्ता चौथी
६. पार्थ प्रवीण वारघडे – इयत्ता दुसरी
७. प्राची कुमार – इयत्ता चौथी
८. प्रियांशू गुप्ता – इयत्ता पहिली, एस.एम.जी. स्कूल
९. प्रितेश गुप्ता – इयत्ता पहिली, साऊथ इंडियन इंग्लिश स्कूल
१०. सार्थक बोळे – इयत्ता तिसरी

## पाचवी ते नववी गट ब

**पहिला क्रमांक**
जान्हवी सांगळे
इयत्ता आठवी
सेंट मेरी स्कूल

**दूसरा क्रमांक**
विनोद जयस्वाल
इयत्ता आठवी
साउथ इंडियन इंग्लिश स्कूल

**तिसरा क्रमांक**
सुरज शर्मा
इयत्ता आठवी
सेंट मेरी स्कूल

**उत्तेजनार्थ**

१. आर्यन दत्तात्रय शिंदे – इयत्ता नववीर, सेंट मेरी स्कूल
२. प्राची हरिश्चंद्र मोगरे – इयत्ता सातवी, गणपत वारेकर स्कूल
३. रुद्र राकेश काजरे – इयत्ता पाचवी, ग्लोबल इंग्लिश स्कूल
४. गिरीजा देसाई – इयत्ता पाचवी
५. वेदांत अनंत पडेलकर – इयत्ता सातवी, गणपत वारेकर विद्यालय
६. वेदांत दिगंबर मोरे – इयत्ता सहावी, ग्लोबल इंग्लिश स्कूल
७. साहिल घोष – इयत्ता आठवी, सेंट मेरी स्कूल
८. श्रेया मनोज बागकर – इयत्ता आठवी, सेंट मेरी स्कूल
९. प्रांजल संजय जाधव – इयत्ता आठवी, सेंट मेरी स्कूल
१०. आर्या अंकुश धोपट – इयत्ता सहावी, सेंट मेरी स्कूल

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, १६ जानेवारी २०२३


## पत्नीची हत्या करणाऱ्या पतीस जन्मठेप

**ठाणे:** पत्नीची हत्या करून ती हरवली असल्याचा बनाव करणाऱ्या राकेश रमेश नौकुडकर या पतीला ठाणे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश डॉ. रचना आर. तेहरा यांनी मंगळवारी दोषी ठरवत, जन्मठेपेची शिक्षा सुनावली. आरोपी हा माजी पोलीस अधिकाऱ्याचा मुलगा आहे. ही घटना २०१६ मध्ये नवीमुंबईत घडली होती. या खटल्यात सरकारी वकील म्हणून रेखा हिवराळे यांनी काम पाहिले.

आरोपीचे मयत सविता हिच्याशी प्रेम विवाह झाल्याने ते नवीमुंबई येथे वेगळे राहत होते. खासगी कंपनीत मोठ्या हुद्यावर असताना, आरोपी त्या कंपनीतील एका मुलीच्या प्रेमात पडला होता. तिच्याशी लग्न करण्यासाठी तो मयत हिच्या वारंवार घटस्फोटाची मागणी करत होता. मात्र ती नकार देत होती. याचाच राग मनात धरून त्याने तिच्या हत्येचा कट रचला आणि हत्या करून ती हरवली असल्याचा बनाव केला. मात्र पोलिसांनी त्याला मोठ्या शिताफीने अटक केली. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाल्यावर याप्रकरणी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले गेले. हा खटला न्यायाधीश डॉ. रचना तेहरा यांच्यासमोर आल्यावर सरकारी वकील रेखा हिवराळे यांनी सादर केले पुरावे आणि साक्षीदारांची साक्ष ग्राह्य मानून आरोपी राकेश नौकुडकर याला दोषी ठरवले. हत्येप्रकरणी जन्मठेप आणि एक हजार रुपयांची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास सहा महिने साधी कारावासाची भोगावी लागेल असे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

### महाराष्ट्र ऑलिम्पिक स्पर्धा

# तेजस लोखंडेला सुवर्ण तर श्रुती मोरेला कांस्यपदक

**ठाणे :** पुण्यातील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे २ ते १२ जानेवारी दरम्यान पार।पडलेल्या महाराष्ट्र ऑलिम्पिक वेटलिफ्टिंग स्पर्धेत ठाणे जिल्ह्यातील खेळाडू तेजस लोखंडे व श्रुती मोरे यांना चमकदार कामगिरी केली आहे तेजस लोखंडे याने ८९ किलो वजनी गटात ३०६ किलो वजन उचलून सुवर्णपदक मिळविले तर श्रुती मोरे हिने ७१ किलो वजन गटात १४८ किलो वजन उचलून कांस्यपदक मिळविले.

तेजस याला काथोड भोईर यांचे मार्गदर्शन लाभले असून सध्या नॅशनल सेंटर ऑफ एक्सीलेंस औरंगाबाद येथे सराव करीत आहे. श्रुती मोरे हिला शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त मधुरा सिंहासने,दत्तात्रय टोळे यांचे मार्गदर्शन लाभले ती सध्या अश्वमेध वेटलिफ्टींग फाऊंडेशनच्या वेटलिफ्टींग सेंटर ठाणे येथे सराव करते.



## ठाण्यात दोन ठिकाणी आगीचा प्रकार

**ठाणे:** नौपाड्यातील कुलकर्णी हाउस या तळ अधिक ५ मजली इमारतीच्या तळमजल्यावर असलेल्या मे. किल नो कॅलरी या रेस्टॉरंटच्या किचनमध्ये इलेक्ट्रिक शेगडीला आग लागल्याची घटना गुरुवारी सकाळी पावणे आठ ते आठ वाजण्याच्या सुमारास समोर आली. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, महावितरण कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान धाव घेतली. तातडीने आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले.तसेच या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याचे आपत्ती व्यवस्थापन कक्षाने सांगितले.तर दुसरी घटना घटना गुरुवारी मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास रुस्तमजी, येथे ठाणे महापालिकेची असलेली पाण्याची टाकी येथील एका मीटर बॉक्सला शॉर्टसर्किटमुळे आग लागली. त्या मीटर बॉक्सचे नुकसान झाले असून कोणालाही दुखापत झालेली नाही. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी महावितरण विद्युत विभागाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. तसेच लागलेली आग अग्निशमन दलाच्या जवानांनी काही मिनीटांमध्ये पूर्णपणे नियंत्रणात आणली. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.



## जिजाऊ आणि विवेकानंदांना अभिवादन

**ठाणे:** ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने महापालिका भवन येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे जिजाऊ माँ साहेब जयंती व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी परिवहन सभापती विलास जोशी, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त २ संजय हेरवाडे, उपायुक्त मारुती खोडके, उपायुक्त प्रशांत रोडे, कार्मिक अधिकारी दयानंद गुंडप, कार्यालयीन अधीक्षक दत्ता गोंधळी, प्र. उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर यांच्यासह कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये ठाण्याच्या स्वप्नील वाल्मीक मांढरे यास रौप्य पदक




**ठाणे :** पुण्याच्या बालेवाडी येथे २ ते १२ जानेवारी दरम्यान पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक २०२३ स्पर्धेमध्ये ठाण्याच्या स्वप्नील वाल्मीक मांढरे या खेळाडूने ज्यूदो या खेळामध्ये - ९० किलो गटामध्ये सिंधुदुर्ग व बीड जिल्ह्याच्या स्पर्धकांना हरवून रौप्य पदक पटकावले.

या क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्यातून सुमारे ९० खेळाडू सहभागी झाले होते. स्वप्नील मांढरे हा ठाणे येथील सरस्वती क्रीडा संकुल नौपाडा येथे वयाच्या १२ व्या वर्षापासून ज्यूदोचे प्रशिक्षक देवीसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली ज्यूदोचा सराव करत आहे. स्वप्निल मांढरे हा मूळचा मुक्काम पोस्ट लोहोम,तालुका खंडाळा, जिल्हा सातारा येथील असून तो कुस्ती देखील चांगल्या प्रकारे खेळतो. स्वप्निल मांढरे हा कापूरबावडी पोलीस ठाणे येथील पोलीस उपनिरीक्षक राष्ट्रपती पदक विजेते वाल्मीक मांढरे यांचा मुलगा असून त्याची बहीण सुप्रिया वाल्मीक मांढरे, पोलीस उपनिरीक्षक व राष्ट्रीय जुदो कुस्ती खेळाडू आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# तुम्ही कितीही मागण्या करा.. निवेदन द्या,सूचना करा...

## जर पालिका प्रशासनाने ठरवलंच असेल दिव्यातील समस्या सोडवायच्या नाहीत...



# तर तुम्ही काय करू शकता?

दिवा न्यूज विशेष

**दिवा शहरात ठाणे महानगरपालिकेमार्फत क्लस्टर योजना राबवली जाणार ही आनंदाची गोष्ट आहे.याबद्दल ठाणे महानगर पालिकेचे आभार मानायला हवेत.या योजनेचा एकंदरीत कार्यक्रम आणि लागणारा कार्यकाल पाहिला तर लगेच ही योजना अस्तित्वात येईल अशी स्थिती नाही.दुसरीकडे दिवा शहरातील अनेक नागरिक, अनेक पक्ष संघटना, राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते येथील लहान मोठ्या समस्यांबाबत अनेक वर्षांपासून पालिकेकडे पाठपुरावा करत आहेत.यातील अनेक समस्या या तातडीने सोडविणे अपेक्षित असते. यातील महत्त्वाच्या समस्यांचा विचार करायचा झाल्यास डम्पिंगचा प्रश्न,पाणी समस्या, रस्त्यावर बसलेले फेरीवाले, आरोग्य समस्या,कचरा समस्या, आणि भरमसाठ येणारी पाणी बिले याचा प्राधान्याने विचार करता येईल.**



वरीलपैकी किती समस्यांवर महापालिका प्रशासनाने नागरिकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने उपाययोजना केल्याचे आपल्याला पहायला मिळते. दिवा शहराच्या नियोजनाचा विचार केल्यास भविष्यात हे शहर सुंदर घडवू हे स्वप्न ऐकण्यासाठी आणि पाहण्यासाठी छान आहे, मात्र सध्या स्थितीला काय हा गंभीर प्रश्न आहे. सध्याच्या स्थितीला आपण पाहिलं तर दिवा स्टेशन पासून ते आगासन रोड पर्यंत आणि दुसरीकडे दिवा स्टेशन पासून साबे रोड त्याचबरोबर दिवा स्टेशन दातिवली रोड या भागात रस्त्याच्या दुतर्फा बसलेले फेरीवाले पाहायला मिळतात. दिव्यात असणारी अवाढव्य लोकसंख्या, अरुंद रस्ते याची वस्तुस्थिती लक्षात घेता नागरिकांना चालण्यासाठी फुटपाथ शिल्लक आहेत का? असा प्रश्न पडतो.पालिका प्रशासनाने मनात आणलं तर काही भाग फेरीवाला क्षेत्र करून उर्वरित भाग ना फेरीवाला क्षेत्र करणे ही अवघड गोष्ट नाही. मात्र मागील पाच- एक वर्ष येथील विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष,राजकीय नेते आणि वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या याची कोणतीच दखल दुर्दैवाने पालिका प्रशासनाला घ्यावीशी वाटली नाही असं म्हणावं लागतंय. फेरीवाला क्षेत्र बनवणे, एका ठराविक ठिकाणी फेरीवाल्यांना बसवणे आणि उर्वरित रस्ते नागरिकांसाठी मोकळे करणे यासाठी पालिका प्रशासनाला फार मेहनत घ्यावी लागेल अशातला भाग नाही. ठाणे महानगरपालिका आणि दिवा प्रभाग समिती यांची मानसिकताच या दृष्टीने दिसत नाही असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल.जे प्रशासन इतक्या छोट्या गोष्टींकडे लक्ष देत नाही ते क्लस्टर योजनेच्या निमित्ताने दिव्यातील नागरिकांना मोठी



स्वप्न दाखवत आहेत हे आश्चर्यच आहे. दुसरी बाब म्हणायची झाल्यास आम्ही मागेच याबाबत सूचना केली होती, दिवा टर्निंग येथे असणारा बस स्टॉप हा चौकाच्या अलीकडे केल्यास तिथे होणारी वाहतूक कोंडी कमी होईल. या दृष्टीने देखील पालिका प्रशासनाला उपाययोजना करण्यास वेळ नाही ही गंभीर गोष्ट आहे. नागरिकांना फार मोठ्या सुविधाची घोषणा करणे सोपे आहे, मात्र छोट्या छोट्या सुविधांची अंमलबजावणी करणं ज्यांना जमत नाही, त्यांच्याकडून या घोषणा होणं हे हास्यास्पद आहे. दिव्यात सध्याच्या घडीला लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढतेय. वाढत्या लोकसंख्येला किमान चालण्या लायक रस्ते असणं इतकी सुविधा तर पालिका प्रशासन करू शकते की नाही? हा आमचा सवाल आहे. दुसरीकडे आरोग्य व्यवस्था असेल किंवा दिव्यातील शैक्षणिक सुधारणा असतील.. याकडे प्रशासनाचे होणार दुर्लक्ष ही चिंतेची बाब आहे. महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून दिवा शहरात उपलब्ध साधनांच्या माध्यमातून राबवले जाणारे किती प्रकल्प आहेत हे प्रशासनाने जाहीर करायला हवेत. आरोग्य सुविधा तात्पुरत्या स्वरूपात काही ठिकाणी सुरू करणे शक्य आहे. महापालिकेने दिवा शहरात एखादे छोटे रुग्णालय सुरू करायला काहीच हरकत नाही.तश्या हालचाली आज पर्यंत झालेल्या दिसत नाहीत. दिवा शहरातील कचरा समस्या,त्याचबरोबर पाणी समस्या याही गंभीर आहेत. पाणी समस्येवर तर दिवा शहरातील प्रत्येक नागरिक हा संतप्त आहे. त्याच्या मनात चीड आहे. नागरिकांना आज तहान लागलेली आहे. उद्याचे स्वप्न पाहण्यासाठी त्यांची तहान आज भागणे गरजेचे आहे...इतकं ढळढळीत सत्य पालिका प्रशासनाला समजलं, त्यांच्या लक्षात आलं तरी ते पुरेसे आहे. फार माफक अपेक्षा दिवा शहरातील नागरिकांच्या असतात. येथे राहणारा बहुसंख्य वर्ग हा नोकरदार वर्ग आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई ,एमआयडीसी या भागात रोजगारानिमित्त जाणारा हा वर्ग राहण्यासाठी दिव्यात आहे. घरी आल्यानंतर सुखाची झोप लागावी इतकीच माफक त्याची अपेक्षा आहे.त्या अपेक्षाही पूर्ण करण्यात मागील दहा वर्षात पालिका प्रशासन अपयशी ठरलेले आहे. ज्या गोष्टी पालिका प्रशासनाच्या हातात आहेत त्या गोष्टीही पालिका प्रशासनाकडून होत नाहीत हे दुर्दैव असून पालिका आयुक्तांनी या संदर्भात गंभीर दखल घेणे गरजेचे आहे. नागरिकांना नागरिक म्हणून जगण्याचा जो अधिकार आहे, किमान तितक्या सुविधा स्मार्ट सिटी होऊ पाहणारी ठाणे महानगरपालिका दिव्यातील नागरिकांना पुरवेल का? हा आमचा प्रश्न आहे.

# पिडीत, शोषित महिला, बालकांना समाजात मानाचे स्थान देण्यासाठी एकत्र काम करूया-जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

## 'पिंक बुक'चे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते प्रकाशन




**ठाणे:** अनैतिक मानवी वाहतुकीमध्ये सापडलेले पिडीत, कठिण परिस्थितीतून गेलेल्या महिला, अनाथ बालके तसेच ज्येष्ठ नागरिक, कामगार, यासह सर्वच दुर्लक्षित घटकांना समाजात मानाचे स्थान मिळावे व त्यांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याची ग्वाही समाजाला देऊ, असे प्रतिपादन ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले.

महिला व बालविकास विभाग व यु कॅन फ्री अस इंडिया संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव न्या. ईश्वर सूर्यवंशी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी महेंद्र गायकवाड, बाल कल्याण समिती अध्यक्ष राणी बैसाने, बाल न्याय मंडळाच्या सदस्य शिल्पा नेलवाडकर, स्वाती रणदिवे, बाल कल्याण समिती सदस्य अर्चना कऱ्हाडे, मनीषा झेंडे, पोखरकर, यू कॅन फ्री अस इंडियाच्या संस्थापक सुजॉय जॉन, मुख्य कार्यकारी अधिकारी शीतल कलांजली, स्वाती सिंग, जिल्हा तपासणी समितीचे सदस्य डॉ. सुधीर सावंत आदी उपस्थित होते. यावेळी सुजॉय जॉन यांनी लिहिलेल्या 'पिंक बुक – अ लाईफ स्किल्स रिसोर्स' या पुस्तिकेचे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

पुढे बोलताना, जिल्हाधिकारी शिनगारे म्हणाले की, गेल्या दोन दिवसांपूर्वी अनाथ बालकांना पालक मिळवू देण्याचे काम करू शकलो याचा मनस्वी आनंद आहे. आयुष्यातील माझ्या सेवेतील हा अत्युच्च क्षणापैकीचा एक क्षण होता. आज समाजातील उपेक्षित, कठिण परिस्थितीतून गेलेल्या व मानसिक कुचंबणेतून बाहेर येऊन सर्वसामान्यांचे जीवन जगण्याचा प्रयत्न करण्यासाठी काम होत आहे, याचा आनंद होत आहे. महिलांच्या कौटुंबिक हिंसाचार, अनैतिक मानवी वाहतूक यामुळे पुरुषप्रधान संस्कृतीत महिलांच्या कर्तृत्वाला वाव मिळाला नाही, ही वस्तुस्थिती आहे. याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

समाजाला घडविण्याचे काम राजमाता जिजाऊ यांच्यासारख्या नारीशक्तीने केले आहे. त्यांच्या शिकवणीमुळे छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारख्या द्रष्ट्या नेत्यांनी मानसिक स्वातंत्र्य मिळवून देण्याचे महान कार्य केले. त्यांनी जर ते केले नसते तर कदाचित आजही आपण मानसिक गुलामगिरीत राहिलो असतो. थोर महापुरुषांना त्यांच्या मातांनी जी शिकवण दिली ती शिकवण समाजात देण्याचे काम करू.

न्यायाधीश सुर्यवंशी म्हणाले की, समाजातील दुर्बल घटक, महिला व बालकांच्या सबलीकरणातून समाज घडविण्याचे काम करताना मिळणारे आत्मिक समाधान इतर कुठल्याही गोष्टीतून मिळत नाही. महिला अत्याचाराबरोबरच पोक्सो कायद्याविषयी समाजात जनजागृती होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक शाळेत यासंदर्भात विशेष उपक्रम राबविण्यात यावे. दुर्बल घटकांना कायदेविषयक सहाय्य करण्यासाठी विधी सेवा प्राधिकरण काम करत आहे. तसेच अत्याचार पिडितांसाठी मनोधैर्य योजनेद्वारे मदत दिली जाते. यांची माहितीही नागरिकांपर्यंत पोचविण्यात यावे.

बाल कल्याण समितीच्या अध्यक्ष बैसणे म्हणाल्या की, बाल कल्याण क्षेत्रात काम करताना अनेक आव्हाने येत असतात. बालकांशी संवाद साधताना त्यांचे वय, त्यांची मानसिकता, संगोपन, परिसरातील वातावरण याचा अभ्यास करावा लागतो. अशा परिस्थितीत पिंक बुक हे पुस्तक या क्षेत्रातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शक ठरेल.

यावेळी मान्यवरांनी राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. बाल न्याय मंडळाच्या सदस्य स्वाती रणदिवे, गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले. यू कॅन फ्री अस इंडियाच्या रुपा दास यांनी आभार मानले. बाल न्याय नियमानुसार ठेवण्यात येणाऱ्या कागदपत्रासंदर्भात जिल्हा बाल संरक्षण अधिकारी रामकृष्ण रेड्डी, संरक्षण अधिकारी पल्लवी जाधव, सामाजिक कार्यकर्त्या रोहिणी शिरसाट यांनी स्वयंसेवी संस्थांना माहिती दिली.

# कोरोना काळातील अवाजवी बिले, रुग्णांचा ५४ लाख ९९ हजार रुपयांचा परतावा अजूनही शिल्लक

## चालढकल करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा

### मनसेचे संदीप पाचंगे यांची मागणी

**ठाणे:** कोरोना उपचारानंतर अवाजवी बिले देत रुग्णांचे खिसे कापणार्या खासगी रुग्णालयांना लगाम घालण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे सरचिटणीस संदीप पाचंगे यांच्या पाठपुराव्यानंतर

ठाणे महापालिका प्रशासनाने कोरोना रुग्णांचे बिल योग्य पध्दतीने तपासण्यासाठी लेखापरिक्षकांची नेमणूक केली होती. यामध्ये १ कोटी ८९ लाख ८२ हजार रुपयांचा आक्षेपार्ह बिलांचा झोल उघडकीस आला. मात्र दोन वर्षे उलटून गेल्यानंतरही १ कोटी ३४ लाख ८३ हजार रूपयांचा रुग्णांना परतावा केला असला तरी अजूनही ५४ लाख ९९ हजार रुपयांचा परतावा शिल्लक आहे. त्यातही तीन रुग्णालयांकडे १० लाखापेक्षा जास्त रक्कम शिल्लक असल्याने त्यांच्यावर कारवाई करून वसुली करण्याचे पत्र लेखा परीक्षण विभागाने आरोग्य विभागाला दिले आहे. मात्र दोन महिने झाले तरी टाळाटाळ सुरु असल्याचे मनसेचे पाचंगे यांनी सांगितले.

कोरोना लढ्यात एकीकडे राज्य शासनाने सुरवातीला 'तुम्ही खबरदारी घ्या, आम्ही जबाबदारी घेतो' अशी आणि नंतर 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' अशी भावनिक साद नागरिकांना घातली होती. मात्र दुसरीकडे ठाण्यात या उक्तीच्या विरोधात खासगी रुग्णालयांनी रुग्णांची लूट सुरु केली होती. कोरोनाच्या उपचारादरम्यान रुग्णालय प्रशासनाच्या गलथान कारभाराविरोधात मनसेचे पाचंगे यांनी आवाज उठवला होता. रुग्णालय प्रशासनाचा बिलांबाबतचा गलथानपणा रोखा, अशी मागणी पालिका आयुक्तांची भेट घेत त्यांनी केली होती. त्यानुसार तात्काळ पालिका प्रशासनाने कोविड रुग्णालयांकडून रुग्णांना दिल्या जाणार्या बिलांचे लेखापरिक्षण करण्यासाठी ८ कनिष्ठ लेखापरिक्षकांची नेमणूक केली होती. आरोग्य विभागाने रुग्णांच्या बिलांबाबत ठरवून दिलेल्या निकषांनुसार बिल रुग्णालय प्रशासनाने दिले का, यावर या टीमने परिक्षण करुन १ कोटी ८९ लाख ८२ हजार १२८ रुपयांची बिलांची रक्कम आक्षेपार्ह ठरवली होती. मात्र तेव्हा ही वाढीव बिले कमी करण्यास रुग्णालयांनी नकार दिला होता. तर काही रुग्णालयांनी कोर्टात जाण्याचा इशारा दिला होता. तेव्हा पाचंगे यांनी वाढीव बिलाचा परतावा रुग्णांना होत नाही तोपर्यंत रुग्णालयांचे नूतनीकरण करू नका असा सल्ला दिला होता. परिणामी अनेक रुग्णालयांनी वाढीव बिलांचा परतावा केला. मात्र काही रुग्णालयांचे प्रशासन वाढीव बिलांचा परतावा करण्यास तयार नाहीत. गांधीनगर येथील एका रुग्णालयाने ५ लाख ५० हजार ६५० रुपयांचा धनादेश रुग्णाचा परतावा म्हणून आरोग्य विभागाकडे दिला आहे. अद्याप ही रक्कम रुग्णांना परत केली गेली नाही. आरोग्य विभागाकडून कारवाईस टाळाटाळ केली जात आहे .जादा बिलाच्या आकारणी संदर्भात पालिकेचे मुख्य लेखा परीक्षक संजय पतंगे यांनी ३० नोव्हेंबर २०२२ रोजी पालिकेच्या आरोग्य विभागाला पत्र लिहिले असून त्यात एका हॉस्पिटलकडून ११ लाख ५४ हजार ८२०, दुसऱ्या हॉस्पिटलकडून १० लाख १० हजार ५४६ आणि तिसऱ्या हॉस्पिटलकडून १५ लाख ५० हजार ८४८ हजार रुपयांचा परतावा शिल्लक आहे. त्या तीन रुग्णालयांकडून कोणताच प्रतिसाद मिळत नसल्याने आपल्या स्तरावर कारवाई करून वसुली करण्यात यावी अशी सूचना केली आहे. मात्र आरोग्य विभागाकडून अद्याप कारवाई करण्यात आली नसल्याचा आरोप ही मनसेचे पाचंगे यांनी केला आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com



# शिंदे, फडणवीस सरकार मुंबई बरोबरच ठाण्याचाही विकास करणार

## - आमदार दरेकर

**ठाणे: युवा सेना प्रमुख आणि आमदार आदित्य ठाकरे यांच्या मातोश्रीकडे कंत्राटदारांची जेवढी माहिती असेल तेवढी अन्य कुणाकडे नाही. गेली २५ वर्षे टक्केवारीचा अनुभव आदित्य यांना आहे. असा आरोप करत, आता गेले सहा महिने मुंबईकरांना जे हवे आहे ते शिंदे – फडणवीस सरकार देत आहे. त्यामुळेच त्यांना पोटशुळ उठला असुन मुंबई हातातुन जात असल्याने ते वैफल्यग्रस्त झाल्याची टीका आमदार प्रवीण दरेकर यांनी केली. तसेच शिंदे, फडणवीस सरकार मुंबई बरोबरच ठाण्याचाही विकास करणार असल्याचे शुक्रवारी ठाण्यात आयोजित एका कार्यक्रमात त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.**



कोरोनाच्या दोन वर्षाच्या कालखंडानंतर यंदा पुन्हा पुर्वीच्याच जोषात ठाण्यातील शिवाईनगर येथील उन्नती मैदान येथे कोकण ग्रामविकास मंडळाच्या वतीने २४ व्या मालवणी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. १३ जाने. ते २२ जानेवारी या दहा दिवसांच्या भव्य मालवणी महोत्सवाची सुरुवात शुक्रवारी आयोजक सीताराम राणे यांनी केले. या महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवारी आमदार दरेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर आमदार संजय केळकर,भाजपा ठाणे जिल्हाध्यक्ष आ. निरंजन डावखरे,मा. नगसेवक संदीप लेले,सचिन मोरे, परिवहन सदस्य विकास पाटील आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी उद्घाटन प्रसंगी आमदार दरेकर यांनी, ठाकरे सरकारने कोकणी माणसाचा कधीच विचार केला नसला तरी आम्ही कोकणचे सर्व आमदार कोकणच्या विकासासाठी सतत पाठपुरावा करू. तसेच, कोकणी उत्पादनाला कायम स्वरूपी बाजारपेठ मुंबई– ठाण्यात मोक्याच्या ठिकाणी उपलब्ध करण्यासाठी पाठपुरावा करणार. तसेच यासाठी जी मदत लागेल ती बँकेच्या माध्यमातुन करणार असल्याचे आश्वासन दरेकर यांनी दिले.

अशा प्रकारच्या महोत्सवाच्या माध्यमातुन कोकणशी नाळ जोडण्याचं काम केले जात आहे. अशा प्रकारच्या महोत्सवातून छोट्या उद्योजकाना प्रोत्साहन मिळते.दरम्यान, मालवणी महोत्सवात येऊन कसा वाटला ? असा प्रश्न आ. दरेकर यांना करताच त्यांनी, 'बरा वाटला ' असा मालवणी भाषेत संवाद साधुन यापेक्षा अधिक मालवणी भाषा येत नसल्याचे नमुद केले.

# ठाणे जिल्ह्यातील १६ अनाथ चिमुकल्यांना मिळाले आई–वडील

**ठाणे :** जिल्हाधिकारी यांच्या दालनात मंगळवारी एक आगळावेगळा अनौपचारिक असा सोहळा पार पडला. जिल्ह्यातील तब्बल १६ बालकांना एकाच वेळी कायदेशीररित्या आई वडिलांचे छत्र मिळाले. दत्तक आदेश घेताना पालकांच्या चेहऱ्यावरचा आनंद अवर्णनीय होता. तर ही प्रक्रिया पार पडताना जिल्हाधिकारी अशोक शिनगारे हेही भावुक झाले होते.

या १६ चिमुकल्यांपैकी ११ मुलींचा समावेश आहे. तसेच तीन बालकांना परदेशी पालक मिळाले आहेत. तर उर्वरित बालकांना महाराष्ट्रात तसेच परराज्यातील पालकांची छत्रछाया लाभणार आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ नुसार अनाथ, सोडून दिलेले व परित्यागीत बालकांचे दत्तक आदेश तसेच नात्यांतर्गत दत्तक व सावत्र दत्तक करण्याकरीता दत्तक नियमावली २०२२ तयार करण्यात आली आहे. त्यानुसार सदर आदेश पारीत करण्याची जबाबदारी आता जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. यापूर्वी दत्तक आदेश न्यायालयामार्फत केले जात होते. आता मात्र ही जबाबदारी जिल्हाधिकारी यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यानुसार या प्रकरणाची सुनावणी करून इच्छुक पालकांकडे दत्तक बालके देण्याबाबतचे आदेश




जिल्हाधिकारी शिनगारे यांनी आज पालकांना सुपूर्द केले. यावेळी दत्तक घेतलेल्या पालकांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसत होता. नेरुळ येथील चिल्ड्रन ऑफ द वर्ड इंडिया ट्रस्ट व डोंबिवली येथील जननी आशिष चॅरिटेबल ट्रस्ट दत्तक संस्थांनी अर्ज प्रक्रिया पूर्ण केली.

यावेळी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी महेंद्र गायकवाड, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी रामकृष्ण रेड्डी, संरक्षण अधिकारी पल्लवी जाधव, सामाजिक कार्यकर्त्या रोहिणी शिरसाट, नेरुळ येथील चिल्ड्रन ऑफ द वर्ड इंडिया ट्रस्ट दत्तक संस्थेच्या बेट्टी मथाई, डोंबिवलीतील जननी आशिष चॅरिटेबल ट्रस्ट वंदना पाटील आदी उपस्थित होते.

बालकल्याण समिती ठाणे यांच्या आदेशान्वये या दोन्ही संस्थांमध्ये अनाथ, सोडून दिलेले व परित्यागीत बालकांना दाखल करण्यात येते. C-R- (Central Adoption Resource Authority) CARINGs cara.nic.in या संकेतस्थळावर दत्तक इच्छुक पालक नोंदणी करून 'कारा' ने दाखविलेले मुलगा किंवा मुलीला पालकांनी राखीव केल्यानंतर दत्तक समितीद्वारे पालकांची मुलाखत घेऊन दत्तक आदेश करीता जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज करण्यात येते.

अनाथ, सोडून दिलेले व परित्यागित बालकांना पालक मिळणे व याचा आनंद हा त्या बालकांच्या चेहऱ्यावर पाहणे क्षण आगळावेगळा आहे. हे मानवतेचे काम माझ्या सहीने होत आहे, हा माझ्या जीवनातील अनोखा क्षण असल्याची भावना जिल्हाधिकारी शिनगारे यांनी यावेळी व्यक्त केली. दत्तक घेणाऱ्या पालकांनी शिनगारे यांनी संवाद साधून त्यांच्या भावना जाणून घेतल्या. यावेळी दत्तक जाणारी बालकेही उपस्थित होती. त्यांच्या हसण्या–खेळण्याने जिल्हाधिकारी यांच्या दालनाला आज वेगळेच रुप आले होते.

# कळव्यातील अनाधिकृत बांधकामांवर कारवाई करु नये

## असेच आदेश तत्कालीन आयुक्तांचे

**काँग्रेसचा आरोप**

**ठाणे :** महापालिका हद्दीत सुरु असलेल्या अनाधिकृत बांधकामांच्या मुद्यावरुन ठाणे शहर काँग्रेस पुन्हा आक्रमक झाली आहे. लोकायुक्तांनी अनाधिकृत बांधकामाबाबत आदेश दिले असतांनाही महापालिकेकडून त्यावर अद्याप कोणतीच कारवाई झालेली नसल्याचा आरोप ठाणे शहर काँग्रेसचे अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी केला आहे. तर तत्कालीन आयुक्त डॉ.विपीन शर्मा यांनी कळव्यातील अनाधिकृत बांधकामांवर कारवाई करु नये, असे आदेश दिले असल्याचा गौप्यस्फोटही केला आहे. सहाय्यक आयुक्तांनी दिलेल्या खुलासामध्ये तसे नमुद करण्यात आले आहे. त्यामुळेच सहाय्यक आयुक्तांची देखील चौकशी थांबली असल्याचेही त्यांनी सांगितले.

ठाण्यात काँग्रेसने घेतलेल्या एका पत्रकार परिषद घेत,त्यामध्ये काँग्रेसचे शहराध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी हा आरोप केला आहे. याप्रसंगी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते सचिन शिंदे,प्रवक्ते राहुल पिंगळे आणि ॲड बाबासाहेब भुजबळ आदी उपस्थित होते, शहरात सुरु असलेल्या अनाधिकृत बांधकामाबाबत लोकआयुक्तांकडे तक्रार करण्यात आली होती. त्यानंतर लोकायुक्तांनी अनाधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास सांगितले होते. तर महापालिकेच्या तत्कालीन आयुक्तांनी अनाधिकृत बांधकामांना नागरी सुविधा पुरविल्या जाणार नसल्याचे आश्वासनही दिले होते. मात्र त्यांनीच या आदेशाला केराची टोपली दाखविली असल्याचा आरोपही चव्हाण यांनी केला आहे. अनाधिकृत बांधकामांमुळे नागरी सुविधांवर ताण वाढत आहे, केवळ मतांचा जोगवा मिळविण्यासाठी काही ठिकाणी लोकप्रतिनिधी व इतर मोठे नेते या बांधकामांना राजाश्रय देत असल्याचेही त्यांनी सांगितले. मात्र त्यामुळे प्रामाणिकपणे कराचा भरणाऱ्या मुळ ठाणेकरांवर त्यामुळे अन्याय होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

अनाधिकृत बांधकाम प्रकरणी महासभेत ठराव झाल्यानंतर आजी, माजी सहाय्यक आयुक्तांची चौकशी लावली गेली. त्यानुसार १४ सहा. आयुक्तांची चौकशी लागली होती. त्यानुसार काहींनी अनाधिकृत बांधकामप्रकरणी स्पष्टीकरण दिले तर काहींनी दिलेले नाही. तर या कारवाईचा अहवाल आयुक्तांकडे पाठविला जाणार होता. परंतु हा अहवाल गुलदस्त्यात असून अद्याप त्यांच्यावर काहीच कारवाई झालेली नाही. असे असतांना आता चव्हाण यांनी तत्कालीन आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांच्यावर केलेल्या गंभीर आरोपामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. अनाधिकृत बांधकाम प्रकरणी तत्कालीन सहाय्यक आयुक्त प्रणाली घोंगे यांनी लेखी खुलासा देतांना कळव्यातील एका बांधकामावर कारवाई न करण्याचे आदेश आयुक्तांनीच दिले असल्याचे त्यात म्हंटले आहे. त्यामुळे ही चौकशीच थांबविण्यात आल्याचा आरोप चव्हाण यांनी केला आहे. दुसरीकडे आता या अनाधिकृत बांधकामांच्या विरोधात पुन्हा लोकायुक्तांकडे तक्रार करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# विशेष पुनरिक्षण कार्यक्रमात जिल्ह्याच्या अंतिम मतदार यादी जाहीर

**ठाणे:** भारत निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार १ जानेवारी २०२३ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रांसह मतदार यादीचा विशेष पुनरिक्षण कार्यक्रमामध्ये ठाणे जिल्ह्यातील एकूण मतदारांची संख्येत ७९ हजार ५६२ एवढी वाढ झाली आहे. विशेष म्हणजे जिल्ह्यातील १८ ते १९ वयोगटात १९ हजार ३९४ नवीन मतदार तर २० ते २९ वयोगटातील ३० हजार ४७१ मतदारांची नव्याने नोंदणी झाली आहे. त्यामुळे एकूण मतदार राजाचा आकडा ६२ लाख १४ हजार ५१७ इतकी झाली आहे.

भारत निवडणूक आयोगाने निवडणुकीत मतदारांची नोंदणी करण्यासाठी विशेष पुनरिक्षण कार्यक्रम घोषित केला होता. त्यानुसार जिल्ह्यात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांच्या मार्गदर्शनासाठी मतदार नोंदणी अधिकारी, सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या बैठका घेऊन मतदार नोंदणी करण्यासाठी विविध उपाय योजना राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार उपजिल्हा निवडणूक अधिकारी अर्चना कदम यांनी पाठपुरावा करून मतदार नोंदणी वाढविण्यासाठी प्रयत्न केले.

**जिल्ह्यातील मतदारराजा ६२ लाख १४ हजार**
**तरुण मतदारांची संख्या ८० हजाराने वाढली**

### असे आहेत मतदार

प्रारुप मतदार यादीत जिल्ह्यात ३३ लाख २८ हजार ९ पुरुष व २८ लाख ६ हजार ९३ महिला आणि इतर ८५३ असे एकूण ६१ लाख ३४ हजार ९५५ एवढे मतदार होते. अंतिम मतदार यादीत ही संख्या ७९ हजार ५६२ ने वाढून पुरुष ३३ लाख ६७ हजार १२० मतदार, महिला २८ लाख ४० हजार ३१९ आणि १०७८ इतर असे एकूण ६२ लाख १४ हजार ५१७ मतदार झाले आहेत.

### युवा मतदार

विशेष म्हणजे अंतिम यादीनुसार जिल्ह्यात युवा मतदारांच्या संख्येतही वाढ झाली आहे. ९ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या एकत्रिकृत प्रारुप मतदार यादीत १८ ते १९ वयोगटातील २६ हजार ७०५ मतदार होते. ५ जानेवारी २०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या अंतिम मतदार यादीत ही संख्या १९ हजार ३९४ ने वाढून ४६ हजार ९९ एवढी झाली आहे. तसेच २० ते २९ वयोगटातील प्रारुप यादीत ९ लाख ९० हजार ९८४ मतदारांची नोंदणी होती. अंतिम यादीत ही संख्या ३० हजार ४७१ ने वाढून १० लाख २१ हजार ४५५ एवढी झाली आहे.

### १७ वर्षावरील १७ हजार ३८८ भावी मतदारांनी केली नोंदणी

मतदार संख्या वाढावी, यासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार नोंदणीसाठी १ जानेवारी, १ फेब्रुवारी, १ जुलै व १ ऑक्टोबर या चार अर्हता दिनांक घोषित केल्या आहेत. तसेच विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम २०२३ दरम्यान १७+ भावी मतदारांच्या नाव नोंदणीसाठी विशेष समर्पित सहायक मतदार नोंदणी अधिकारी नेमण्यात आले होते. त्यांच्यामार्फत मोहिम राबवून युवा मतदारांची नोंदणीसाठी शिबिरे आयोजित केली होती. त्यामुळे जिल्ह्यात १७ वर्षे पूर्ण झालेल्या भावी मतदारांच्या संख्येत वाढ झाली असून जिल्ह्यात एकूण १७ हजार ३८८ युवकांनी विधानसभा मतदारसंघ स्तरावर अर्ज केले आहेत.

## क्लस्टर योजनेतील अधिकृत इमारतीबाबतचा संभ्रम दूर

**ठाणे:** ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक, अनियोजित, अनधिकृत इमारती तसेच झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास व्हावा या हेतूने नागरी पुनरुत्थान योजना (क्लस्टर) चे नियम शासनाने घोषित करून ते ठाणे महानगरपालिकेच्या तत्कालीन अंमलात असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये शासनाने ०५.०७.२०१७ रोजी अंतर्भुत केले आहे. त्यानंतर ०२.१२.२०२० रोजी मंजुर झालेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये विनियम क्र. १४.८ मध्ये सदर विनियम अंतर्भूत केला आहे, त्यास अनुसरून ठाणे महानगरपालिकेने शहरामध्ये ४५ क्लस्टर आधिसुचित करण्यात आले आहेत.

क्लस्टरमध्ये गावठाण, कोळीवाडे यांचे क्षेत्र जरी वगळले असले तरी व्यापक नियोजनाच्या व सलगतेच्या दृष्टीने अनियोजित व धोकादायक इमारतीसह लगतच्या क्षेत्राचा विकास होणे अपेक्षित आहे. त्या दृष्टीने ४०% मर्यादिपर्यंत अधिकृत इमारतीखालील क्षेत्राचा समावेश क्लस्टर मध्ये करणेबाबत तरतुद समाविष्ट करण्यात आली आहे. तसेच अशा अधिकृत इमारती ज्या क्लस्टरमध्ये समाविष्ट होऊ इच्छितात त्यातील ७० % रहिवाशांची संमती आवश्यक आहे. अन्यथा अशा इमारती पुनर्विकासासाठी विचारात घेतल्या जात नाहीत.

शासनाने २८.१२.२०२२ रोजी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार क्लस्टर योजना अंमलबजावणीमध्ये अधिक सुलभता येण्याच्या दृष्टीकोनातुन काही फेरबदल मंजूर केले आहेत. या फेरबदलामध्ये क्लस्टर विकासाकरिता विनियम क्र.१४.८ मध्ये काही तरतूदीत बदल व काही नवीन तरतूदींचा समावेश केला आहे. शासनाने नव्याने समावेश केलेली तरतूद विनियम क्र.१४.८.५ (ीं) अन्वये आहे. सदर तरतुदीनुसार क्लस्टर योजनेत सहभागी होणारी सर्व घरे व इमारती यातील रहिवाश्यांच्या पुर्नवसनाबाबत नमुद केले आहे.सदर तरतूद ही या योजनेतील पात्र लाभार्थींच्या संबंधित आहेत व या पात्र लाभार्थींचे संमतीचे अनुषंगाने महानगरपालिकेने अनुसरावयाच्या पुढील कार्यवाही संबंधित आहे.

मात्र, या तरतुदीमध्ये अधिकृत इमारतीचा (रींहींळूशव र्लीळश्रवळपसी) समावेश असल्याने नागरीकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली होती. याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने अधिक स्पष्टतेसाठी ११.०१.२०२३ रोजी शुध्दीपत्रक प्रसिध्द करून सदर समाविष्ट तरतुदीतील अधिकृत इमारती संबंधित रींहींळूशव हा शब्द वगळण्याचा निर्णय घेतला आहे. याद्वारे नागरीकांच्या मनातील संभ्रमावस्था दूर होण्यास मदत होईल.

# ठाण्यात आदित्य ठाकरेंची डरकाळी!

## हे सरकार तरुणांमध्ये जाती- धर्माच्या नावावर भांडणे लावतेय,शिंदे फडणवीस सरकारवर आदित्य ठाकरे यांची टीका

**ठाणे:** हे सरकार मोगलांचे सरकार असल्याची टीका शिंदे सरकारवर करत, राज्यात एवढे प्रश्न असताना तरुणांमध्ये जाती आणि धर्माच्या नावावर भांडणे लावण्यात येत आहेत. याशिवाय राज्यातील महापालिकांच्या निवडणूक प्रलंबित असताना हे सरकार निवडणूका लावण्याची हिंमत का दखवत नाही असा प्रश्न देखील युवा सेनाप्रमुख आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी ठाण्यात शनिवारी एका कार्यक्रमात उपस्थित केला. याचदरम्यान आम्ही सहा महिन्यांपूर्वी काय केले हीच एकच टेप वाजवली जात असल्याचा टोला त्यांनी शिंदे सरकारला लगावला. हे सरकार अल्पावधीत कोसळणारच असा पुनरुच्चार पुन्हा एकदा त्यांनी केला आहे.

ठाणे महापालिकेचे माजी नगरसेवक व माजी उपमहापौर नरेश मणेरा यांच्यावतीने ठाण्यात शनिवारी महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उदघाटन आदित्य ठाकरे यांच्या हस्ते झाले. यावेळी खा. राजन विचारे यांच्यासह खा. अरविंद सावंत तसेच शिवसेनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना, आदित्य ठाकरे यांनी ठाण्यात एकीकडे निष्ठावान शिवसैनिकांकडून ठाण्यात रोजगार मेळावे आयोजित करण्यात येतात तर दुसरीकडे ठाण्याच्याच एका गद्दारीने महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला नेले असल्याचे टीका त्यांनी केली आहे.

शिवसेनेचा जन्म हा रोजगार आणि स्थानिकांना न्याय देण्यासाठी झाला आहे. मात्र हे सरकार उद्योग बाहेर पाठवण्याचे काम करत आहे. ज्यावेळी उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिला त्यावेळी हेच लोक टेबलावर नाचले होते या मानसिकतेचाही ठाकरे यांनी निषेध केला. शिवसेनेची भुमीका स्पष्ट असून हाताला काम देण्याची. रोजगाराची संधी असल्यास मराठी मुलांनी जगात कुठेही जाण्याची तयारी ठेवली पाहिजे असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. राज्यात काही नवीन चर्चा होत नाही केवळ एकाच कॅसेट वाजवली जात असून यामध्ये कार्यक्रम कोणताही असो त्यात आम्ही सहा महिन्यांपूर्वी काय केले ही एकच टेप वाजवली जात असल्याचा टोला त्यांनी लगावला आहे.

शिंदे सरकारवर टीका करताना ठाकरे यांनी हे सरकार मोगलांचे सरकार असून या सरकारच्या मंत्रिमंडळात एकाही महिलेचा समावेश नसल्याचे सांगत या सरकारमध्ये शेतकऱ्यांचे आवाज दाबला जात असे ही म्हटले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, १६ जानेवारी २०२३


# रस्त्यांची कामे गुणवत्तापूर्वक होण्याच्या दृष्टीने 'थर्ड पार्टी ऑडिट म्हणून आयआयटीची नियुक्ती

## –आयुक्त अभिजीत बांगर

**ठाणे :** ठाण्याचे नागरिकरण झपाट्याने होत आहेत, या अनुषंगाने येथील वाहतूक सुरळीत व सुरक्षित व्हावी यादृष्टीकोनातून रस्त्याचे काम करण्यात येत आहे. परंतु पावसाळ्यामध्ये डांबरी रस्त्यांवर खड्डे पडत असतात, परिणामी दरवर्षी अनेक समस्यांना सामोरे जावे लागते व वारंवार आर्थिक खर्चही पालिकेला सोसावा लागतो. यापुढे महापालिकेमार्फत बांधण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामांसाठी सल्लागार व थर्ड पार्टी ऑडिटसाठी आयआयटीची नियुक्ती करण्यात येणार असल्याचे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र शासनाकडून महापालिका कार्यक्षेत्रातील रस्त्यांच्या कामासाठी निधी उपलब्ध झाला आहे, या निधीअंतर्गत रस्त्यांची कामे हाती घेण्याचे प्रस्तावित नागरिकांना गुणवत्तापुर्ण रस्ते मिळावेत यासाठी सल्लागार म्हणून व थर्ड पार्टी ऑडिटसाठी आयआयटीला नियुक्त केले जाणार असल्याची माहिती आज झालेल्या बैठकीत आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिली.

महापालिका कार्यक्षेत्रात सध्या सुरू असलेल्या व नव्याने करण्यात येणाऱ्या रस्त्यांची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले असून या सर्व रस्त्यांची कामे उत्कृष्ट दर्जाची व गुणवत्तापूर्वक व्हावी यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या कंत्राटदारांनाही आयआयटीच्या माध्यमातून मार्गदर्शन



करण्यात येईल यासाठी कार्यशाळेचे देखील आयोजन करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. नव्याने तयार करण्यात येणाऱ्या रस्त्याचा आराखडा योग्य पध्दतीने तयार करुन कुठल्याही ठिकाणी पाणी साचणार नाही, रस्त्याच्या साईडपट्टीचे काम, पावसाळी पाण्याचा योग्य निचरा होईल या दृष्टीने रस्त्यांच्या दुतर्फा गटारे आदी गोष्टींचा समावेश करुनच काम करावे असेही आयुक्तांनी नमूद केले.

रस्त्याचे काम सुरू असताना प्रत्यक्ष जागेवर जावून कामाची पाहणी करण्यात येईल. यासाठी वापरण्यात येणारे साहित्यांची योग्य दर्जाचे आहे की नाही याची देखील तपासणी आयआयटीच्या मार्गदर्शकांकडून करण्यात येणार असल्याचे बांगर यांनी नमूद केले. रस्ते बांधकामासाठी लागणारे साहित्य (उदा. डांबराची गुणवत्ता) ज्या ठिकाणी बनविले जाते त्या युनिटला भेट देवून त्याची गुणवत्ता तपासली जाईल. तसेच ज्या ठिकाणी प्रत्यक्ष रस्त्याचे काम चालू आहे त्या साईटवर साहित्य येईपर्यंत साहित्याचा तपशील ( डशिलळषळलरींळेप) आयआरसीच्या नॉर्म्सप्रमाणे राहिल याची दक्षता घेतली जावी, त्यासाठी प्लांटला व्हिजीट देणे, तसेच बांधलेल्या रस्त्याची गुणवत्ता तपासण्यासाठी वेगवेगळ्या टेस्ट (उदा. कॉक्रिट रस्त्यासाठी बीम टेस्ट करणे गरजेचे आहे) असल्याचेही मत देखील व्यक्त केले. संपूर्ण काम हे महापालिकेच्या निविदेनुसार होत आहे की नाही यावर देखील कटाक्षाने लक्ष दिले जाणार आहे, जेणेकरुन रस्त्यांसाठी उपलब्ध केलेल्या निधीचे योग्य विनियोग होवून नागरिकांना चांगले व प्रशस्त रस्ते उपलब्ध होतील असेही आयुक्तांनी यावेळी नमूद केले.

सध्या सुरू असलेल्या व नव्याने प्रस्तावित असलेल्या रस्त्यांची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर असल्याने तसेच सदर कामांसाठी वेगवेगळे कंत्राटदार असल्याने त्यांच्यावर देखील आयआयटीचे पूर्ण लक्ष असले पाहिजे असेही आयुक्तांनी बैठकीत नमूद केले. सद्यस्थितीत सुरू असलेली कामे फेब्रुवारी अखेरपर्यंत व प्रस्तावित कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात यावी असे निर्देशही आयुक्तांनी यावेळी दिले.

# सुशोभीकरण करा पण, ठाणे शहराचा सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा जपा

## धर्मराज्य पक्षाची मागणी

**ठाणे :** ठाणे महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने सध्या ठाणे शहरात सुशोभीकरणाचे काम हाती घेण्यात आलेले असून, शहरातील भिंती रंगविण्याचे काम युद्धपातळीवर सुरु करण्यात आलेले आहे. भिंतीचे रंगकाम करताना, त्यात झाडे, फुले, प्राणी-पक्षी, विविध प्रकारचे नक्षीकाम आणि इतर सामाजिक-प्रबोधनात्मक उपक्रमांच्या कलाकृती रेखाटण्यात येत आहेत. या रंगकामामुळे ठाणे शहरातील रस्ते-पदपथ, भिंती व सार्वजनिक ठिकाणे सुबक दिसत असून, रस्त्यांना आकर्षक स्वरुप प्राप्त झालेले आहे. महापालिका प्रशासनाने, शहर सुशोभीकरणाच्या दृष्टीने उचललेले हे पाऊल नक्कीच स्वागतार्ह असून, त्याबाबत 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांचे आभार मानत, ले आहेत. सुशोभीकरण करा पण, ठाणे शहराचा सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा जपा अशी मागणीही केली आहे.

ठाणे शहर हे तलावांचे शहर म्हणून परिचित असले तरी, ऐतिहासिक अशा ठाणे शहराला फार मोठा सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. भारतातील पहिलीवहिली रेल्वे मुंबई ते ठाणे अशी सुरु झाल्याची अभिमानास्पद अशी ऐतिहासिक घटना; तसेच, ठाण्याला लाभलेला खाडीकिनारा आणि भरघोस वनसंपदा लाभलेला येऊर परिसर, ठाणे शहराच्या नैसर्गिक व पर्यावरणीय संपत्तीत अधिकाधिक भर घालत आहेत. आगरी-कोळी समाजाचे मूळ 'ठाणे' असलेले हे शहर, आशिया खंडातील एकेकाळची सर्वात मोठी उद्योगनगरी म्हणून ओळखले जाते. दुर्दैवाने, ठाणे शहराची औद्योगिकदृष्ट्या पीछेहाट झालेली असली तरी, आजही श्रमिक आणि कष्टकऱ्यांचे शहर म्हणून ठाण्याची ओळख अबाधित आहे.दरम्यान, हा वारसा जपत असताना, ठाणे महानगरपालिकेची स्थापना झाल्यावर, महापालिकेचे जे बोधचिह्न आहे, त्यावरदेखील शहरातील या वारशांचा समावेश करण्यात आलेला आहे. ज्यापद्धतीने सध्या ठाणे शहरातील भिंती रंगविण्याचे काम सुरु करण्यात आलेले आहे, त्यात शहराच्या या ऐतिहासिक वारशांचा समावेश करण्यात यावा. प्राचीन कौपिनेश्वर मंदिर, मासुंदा तलाव, राम गणेश गडकरी रंगायतन, ऐतिहासिक ठाणे रेल्वे स्थानक, दादोजी कोंडदेव क्रीडा प्रेक्षागृह, ठाण्याचा खाडीकिनारा, येऊरचे जंगल, ठाणे मध्यवर्ती कारागृह (पूर्वाश्रमीचा ठाण्याचा किल्ला) ही, ठाणे शहरातील ठिकाणे, ठाणेकर नागरिकांच्या दृष्टीने अभिमानस्पद अशी मानबिंदू आहेत. त्यामुळे ठाण्यातील नवीन पिढीला, जुन्या ठाण्याची ओळख व्हावी, यासाठी ठाणे शहरातील भिंती रंगविताना, या ऐतिहासिक वास्तूंचा आवर्जून समावेश करण्यात यावा, अशी मागमी ही'धर्मराज्य पक्षा'चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

**एकाच वेळी आले दोन गुन्हे उघडकीस**

# गोळीबार करणारे त्रिकुट निघाले घरफोडीतील चोरटे

## अग्निशस्त्रांसह जिवंत काडतुसे जप्त

**ठाणे: किराणा व्यापाऱ्यावर गोळीबार करणाऱ्या रफीक मेहबुब शेख उर्फ रफीक बाटला (४०),रमेश कुंदर राम (३३) आणि अंजुम इब्राहीम शेख (४०) या त्रिकुटाला ठाणे शहर पोलिसांनी अटक करत, त्यांच्याकडून या गुन्हयात वापरलेल्या अग्निशस्त्रांसह जिवंत काडतुसे, चारचाकी वाहन असा दोन लाखोंचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच त्यांनी त्या गुन्हयांची कबुली दिली असून त्यांनी त्या व्यापाऱ्याला लुटण्याचा उद्देशाने गोळीबार केल्याचे तपासात समोर आहे. घरफोडीच्या गुन्हात मिळालेल्या अग्निशस्त्रामुळे गोळीबाराचा गुन्हा असे दोन गुन्हे उघडकीस आणण्यात राबोडी पोलिसांना यश आले आहे.**



घरफोडीच्या गुन्हाचा तपास करताना राबोडी पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार दयानंद नाईक यांना अटकेतील त्रिकुटाने तो गुन्हा केल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्यांना ताब्यात घेतले. तसेच त्याच्या घरझडतीत दोन अग्निशस्त्र आणि दोन जिवंत काडतुसे मिळून आली. याचा तपास करताना, त्यांनी यापूर्वी राबोडी पोलीस ठाण्यांतर्गत दाखल असलेल्या गोळीबाराच्या गुन्ह्यात जप्त केलेल्या अग्निशस्त्राचा वापर केल्याचे समोर आले.

तसेच त्या गुन्हयात मिळालेली रिकामी पुंगळी ही सारखीच असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर त्यांनी त्या गुन्ह्याची कबुली दिली. त्यांनी किराणा व्यापाऱ्यावर गोळीबार करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आणि तेथून पळ काढल्याचे म्हटले आहे. यातील अंजुम याने किराणा व्यापारी हा त्यांच्या दुकानातुन रोख रक्कम ज्या वाहनावरून घेऊन जात होते त्याची माहिती रफीक आणि रमेशला देत, गोळीबार केला होता. रफीक हा भंगार खरेदी विक्री करणार असून रमेश रिक्षाचालक आहेत. तर अंजुम हा चालक आहे. ते तिघे ही राबोडी परिसरात राहणारे असून अशाप्रकारे राबोडी पोलिसांनी दोन गुन्हे उघडकीस आणत त्या गुन्ह्यामधील एक लाख ८१ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष घाटेकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) राजेंद्र गुजर, सहायक पोलीस निरीक्षक योगेश धोंगडे, पोलीस उपनिरीक्षक दिपक पाटील, सहा पोलीस उप निरीक्षक अजित पालकर, पोलीस हवालदार दयानंद नाईक, राजेश देशमुख, राजेंद्र पाटील, आदींनी केली.

# दिव्यात मनसे मजबूत होणार



## आमदार राजू पाटील यांच्याकडून नव्या नियुक्त्या जाहीर!





दिवा:-महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने दिवा शहरात पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी पदाधिकारी व नव्या नियुक्त जाहीर केले आहेत.कल्याण ग्रामीणचे आमदार राजू पाटील यांच्या हस्ते नवीन पदाधिकाऱ्यांना नियुक्त पत्र देण्यात आले. महाराष्ट्र नवनिर्माण सेना दिवा शहराच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या प्रभागनिहाय नेमणुका जाहीर करण्यात आल्या असून यामध्ये

**प्रभाग क्रमांक - ४३**

विभाग अध्यक्ष - **देवेंद्र अशोक भगत**
विभाग सचिव - **केतन अनिल तांबे,**
उपविभाग अध्यक्ष - **भानुदास पाटील**
उपविभाग अध्यक्ष - **गणेश अशोक भोईर**

प्रभागक्रमांक - ४४

विभाग अध्यक्ष - **दिलीप श्याम गायकर**
विभाग सचिव - **समीर सुरेश पाटील**
उपविभाग अध्यक्ष - **केजू गोरखनाथ मुंडे,**

प्रभागक्रमांक - ४५

विभाग अध्यक्ष - **प्रकाश दत्ता पाटील**
विभाग सचिव - **परेश भास्कर पाटील**
उपविभाग अध्यक्ष - **ऋषिकेश श्रीराम भगत**
उपविभाग अध्यक्ष - **शैलेंद्र भगवान कदम**

आदींचा समावेश आहे.






## मनसेचे प्रकाश पाटील यांची प्रभाग क्र.४५च्या विभाग अध्यक्षपदी नियुक्ती



दिवा:-दिव्यातील मनसेचे युवा व डॅशिंग कार्यकर्ते प्रकाश पाटील यांची प्रभाग क्रमांक ४५ च्या विभाग अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रकाश पाटील हे मागील अनेक वर्षापासून मनसेमध्ये सक्रिय आहेत. मनसे दिवा शहर अध्यक्ष तुषार पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रकाश पाटील हे पक्ष संघटनेत अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत. त्यांच्या पक्ष कार्याची दखल घेत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पक्ष नेतृत्वाने प्रकाश पाटील यांच्यावर दिवा शहर प्रभाग क्रमांक ४५ च्या विभाग अध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवली आहे. दिव्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्ष संघटना मजबूत करण्यावर भर देत असून नुकत्याच दिवा शहरातील विविध पद नियुक्त्या संघटनेमार्फत जाहीर करण्यात आले आहेत.